महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २३५ वे दिनांक : २१/०८/२०२६ वार : शुक्रवार

## देवळाईतील ४० एकरांवरील अनधिकृत प्लॉटिंग उद्ध्वस्त; ४५० प्लॉटचे मार्किंग उखडले



**छत्रपती सांभाजीनगर** : सोलापूर-धुळे महामार्गावरील देवळाई (सातारा परिसर) येथे ३५ ते ४० एकर जागेवर उभारण्यात आलेले अनधिकृत ले-आऊट मनपाने बुधवारी (१९ ऑगस्ट) उद्ध्वस्त केले. जयशंकर डेव्हलपर्सने कोणतीही एनए किंवा अधिकृत परवानगी नसताना येथे श्री साईनगर नावाने बेकायदा प्लॉट पाडले होते. मनपाच्या अतिक्रमण विभागाने महापौर समीर राजूरकर, आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशान्वये कारवाई करत येथील ४५० प्लॉटच्या मार्किंग, विकासकाचे अनधिकृत कार्यालय आणि ५ पक्की बांधकामे पाडून टाकली आहेत.

कोणत्याही सोयी-सुविधा किंवा अधिकृत मंजुरी नसताना स्वस्तात प्लॉटचे आमिष दाखवून नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक या ठिकाणी सुरू होती. या ठिकाणी मागील काही वर्षांपासून हप्त्यावर प्लॉट देणे सुरू होते. या ठिकाणी ३५० पेक्षा अधिक नागरिकांनी हप्त्यावर प्लॉटदेखील खरेदी केले आहेत. या प्रकरणी विक्री करणाऱ्या शेख मोईन आणि त्यांच्या साथीदारांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

भूमाफियांनी वन विभागाच्या अखत्यारीतील जागेवरही अतिक्रमण करून तेथे ले-आऊट पाडल्याचे समोर आले आहे. मनपाचे अतिक्रमण विभागाचे संनियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे आणि त्यांच्या पथकाने या प्रकरणी संबंधित प्लॉटिंगधारकांना नोटीस बजावत परवानगीबाबत विचारणा केली होती. मात्र, प्लॉटधारकांकडे कसलाही कायदेशीर पुरावा किंवा अधिकृत मंजुरी नसल्याने बुधवारी थेट मनपाचा जेसीबी या बेकायदा साम्राज्यावर पडला.

मागील ५ वर्षांपासून या ठिकाणी प्लॉटिंग सुरू होती. मात्र मनपाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांना या अनधिकृत प्लॉटिंगबाबत दिसले नाही. विशेष म्हणजे निसर्गरम्य परिसरात ही प्लॉटिंग असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्लॉटला मागणी होती. ६०० चौरस फुटांचा प्लॉट ८ ते १० लाख रुपयांना विक्री होत होता. अनधिकृत प्लॉटिंग असताना या ठिकाणी मनपाच्या आशीर्वादाने ड्रेनेजलाइन आणि रस्त्याचीदेखील सोय करण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे यामध्ये मनपाच्या कोणत्या अधिकाऱ्यांचा हात आहे हे शोधणेदेखील महत्त्वाचे आहे.

काही भूमाफियांकडून अनधिकृत प्लॉटची विक्री करून नागरिकांची फसवणूक करण्याचा प्रकार गोपनीय सूत्रांनी सांगितला होता. महापौर आणि आयुक्त यांच्या आदेशाने सुमारे ४० एकरांवरील अनधिकृत प्लॉटिंगवर कारवाई करण्यात आली आहे. सामान्य नागरिकांची फसवणूक करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. अशा अनधिकृत प्लॉटिंगबाबत माहिती असल्यास नागरिकांनी कळवावे. त्यांचे नाव गोपनीय ठेवून कारवाई करण्यात येईल. -संतोष वाहुळे, संनियंत्रण अधिकारी, अतिक्रमण विभाग, महानगरपालिका.

## देसाईंचा ठाकरे गटावर निशाणा; 'धनुष्यबाण गोठवा' म्हणजे विचार गोठवणे

**मुंबई** : "धनुष्यबाण हे केवळ एक चिन्ह नसून ते वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आहेत. बाळासाहेबांनी या चिन्हाला देव्हाऱ्यात पुजले होते. आता 'धनुष्यबाण आम्हाला मिळत नसेल तर तो गोठवून टाका', ही मागणी करणे म्हणजेच बाळासाहेबांचे विचार गोठवण्यासारखे आहे," असा जोरदार घणाघात शिवसेनेचे (शिंदे गट) मंत्री शंभूराज देसाई यांनी ठाकरे गटावर केला आहे. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाने (उबाठा) केलेल्या मागणीवर प्रतिक्रिया देण्यासाठी शंभूराज देसाई यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली.

गेले काही दिवस सर्वोच्च न्यायालयात शिवसेनेच्या चिन्हाबाबत सुनावणी सुरू आहे. ही सुनावणी अंतिम टप्प्यात असताना ठाकरे गटाचे नेते अरविंद सावंत यांनी 'धनुष्यबाण चिन्ह गोठवण्यात यावे' अशी मागणी केली. यावर बोलताना देसाई म्हणाले, "जेव्हा त्यांना लक्षात आले की हे चिन्ह आता आपल्याला मिळणार नाही, तेव्हा त्यांनी अशी मागणी केली. म्हणजेच स्वतःला मिळत नाही तर ते दुसऱ्यालाही मिळू नये, ही त्यांची बेगडी भूमिका समोर आली आहे."

बाळासाहेब ठाकरे यांनी कायम सांगितले होते की, 'शिवसेनेचा भगवा झेंडा आणि धनुष्यबाण शिवसैनिकांनी कधीही खाली पडू देऊ नये.' असे असताना ठाकरे गटाचे नेतेच चिन्ह गोठवण्याची भाषा करत आहेत. २०१९ मध्ये महाविकास आघाडी करताना उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व आणि बाळासाहेबांचे विचार बाजूला ठेवले होते. आता चिन्ह गोठवण्याची मागणी करून ते पुन्हा एकदा बाळासाहेबांच्या विचारांशी द्रोह करत आहेत, असा आरोप देसाई यांनी केला. ठाकरे गटाच्या या भूमिकेमुळे राज्यभरातील शिवसैनिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. जे चिन्ह बाळासाहेबांनी देव्हाऱ्यात पुजले, तेच चिन्ह गोठवण्याची मागणी करणे म्हणजे बाळासाहेबांच्या विचारांनाच संपवण्याचा प्रयत्न आहे. शिवसैनिक योग्य वेळी या वक्तव्याला चोख उत्तर देतील, असा इशाराही देसाई यांनी दिला.

आदित्य ठाकरे वारंवार 'पक्ष आणि चिन्ह चोरले' असा आरोप करतात. यावर उत्तर देताना देसाई म्हणाले की, संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार केंद्रीय निवडणूक आयोगाने (ECI) सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतरच शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे यांना दिले आहे. हे आम्ही चोरलेले नाही, तर कायदेशीर प्रक्रियेतून मिळवले आहे.

जर आम्ही पक्ष चोरला असता, तर आमच्या आमदारांची संख्या ४० वरून ६० झाली नसती. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जनतेने आम्हाला एवढे मोठे बहुमत दिले नसते. महाराष्ट्रातील जनतेने मतदान करून हे सिद्ध केले आहे की एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनाच ही खरी शिवसेना आहे, असे शंभूराज देसाई यांनी स्पष्ट केले.

सुप्रीम कोर्टातील कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावर बोलताना देसाई म्हणाले की, सध्या केवळ ठाकरे गटाची बाजू ऐकली जात आहे. जेव्हा आमची वेळ येईल, तेव्हा आमचे वरिष्ठ वकील सर्वोच्च न्यायालयात या सर्व आरोपांना सडेतोड आणि कायदेशीर उत्तर देतील.

## देवदत्त कामतांचा सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद; 'पक्षांतराचे फायदे घेणाऱ्यांना थेट अपात्र ठरवा'


**नवी दिल्ली** : शिवसेना पक्ष-चिन्ह आणि आमदार अपात्रता प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयातील आजची सुनावणी संपली आहे. आजच्या सुनावणीत ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर अत्यंत आक्रमक आणि कायदेशीर दाखल्यांसह युक्तिवाद केला. कामत यांनी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली की, विधानसभा अध्यक्षांचा निर्णय चुकीचा ठरवत न्यायालयाने स्वतः एकनाथ शिंदे आणि त्यांच्या आमदारांना बंडखोरीच्या मूळ तारखेपासून अपात्र घोषित करावे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती जे. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सलग 7 व्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी पार पडली. ॲड. कामत यांनी युक्तिवाद केला की, "एखादा आमदार अपात्र ठरला की त्याचे सदस्यत्व संपुष्टात येते. या खटल्यात एका विशिष्ट वेळेत सुनावणी पूर्ण होऊ न शकल्यामुळे शिंदे गटाने या पक्षांतराचा फायदा उपभोगला आहे. एवढेच नाही तर, निवडणूक आयोगाने केवळ 'विधिमंडळ बहुमताच्या' आधारावर त्यांना चिन्ह दिल्यामुळे आजही ते बंडखोरीचे आणि पक्षांतराचे फायदे उपभोगत आहेत." खंडपीठाने विचारले की, "कशातून अपात्र ठरवावे?" यावर कामत म्हणाले, "ज्या दिवशी पक्षांतराचे कृत्य घडले, त्याच मूळ तारखेपासून त्यांचे सदस्यत्व संपुष्टात आल्याची कायदेशीर घोषणा सर्वोच्च न्यायालयाने करावी, एवढीच माझी मागणी आहे. आता कदाचित त्याचे परिणाम पूर्ववत अमलात आणणे शक्य नसले, तरीही ते केव्हा अपात्र ठरले होते, हे न्यायालय नक्कीच घोषित करू शकते."खंडपीठाने विचारले की, संबंधित पक्ष आणि अध्यक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६


## कन्नड तालुक्यातील शिक्षक-प्राध्यापकांना 'महात्मा फुले पुरस्काराने' सन्मानित करणार



**कन्नड : (प्रतिनिधी)** समाजसुधारक महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्रैमासिक तिफण व तिफण वाचक चळवळ यांच्यावतीने कन्नड तालुक्यातील शिक्षण, साहित्य, कला, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या कार्यरत शिक्षक व प्राध्यापकांना 'महात्मा फुले पुरस्काराने' सन्मानित करण्यात येणार आहे.समाजात विचारांची पेरणी करून विद्यार्थ्यांसोबतच समाजाला दिशा देणाऱ्या गुरुजनांच्या कार्याचा गौरव करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. कन्नड तालुक्यातील शाळा व महाविद्यालयात सध्या कार्यरत असून ज्यांनी शिक्षणासोबतच साहित्य, कला, सांस्कृतिक किंवा क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे असे गुरुजन या पुरस्कारासाठी पात्र असतील. प्रतिकूल परिस्थितीतून विद्यार्थी घडवणे, ग्रामीण भागात शैक्षणिक चळवळ उभी करणे, साहित्य निर्मिती, कलाविष्कार, सांस्कृतिक उपक्रम आणि क्रीडा क्षेत्रात घवघवीत यश मिळवून देणाऱ्या कार्याला प्राधान्य दिले जाणार आहे.तिफण वाचक चळवळीच्या समितीद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे पात्र शिक्षक-प्राध्यापकांची निवड केली जाईल. पुरस्कारामध्ये सन्मानपत्र, ग्रंथ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. लवकरच पुरस्काराची घोषणा केली जाईल. पुरस्कार वितरणाचा विशेष कार्यक्रम लवकरच कन्नड येथे आयोजित करण्यात येणार असून कार्यक्रमाची तारीख व वेळ लवकरच जाहीर करण्यात येईल.असे आवाहन तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे व डॉ. रामचंद्र झाडे यांनी कळविले आहे.

## सद्भावना दिनानिमित्ताने राजीव गांधी यांना अभिवादन



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती निमित्ताने (२० ऑगस्ट) त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र. प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रा.अभिजीत भुतेकर यांनी सद्भावना दिनानिमित्ताने विचार व्यक्त केले. डॉ.रवींद्र शिंपी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी उपस्थित शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सद्भावनेची शपथ घेतली.

## आसेगाव येथील ३६ वर्षीय युवक बेपत्ता; दौलताबाद पोलिसांत नोंद



**दौलताबाद (जावेद अहमद) :** गंगापूर तालुक्यातील आसेगाव येथील अर्जुन भिमराव काकडे (वय ३६) हे गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असून याप्रकरणी दौलताबाद पोलीस ठाण्यात मिसिंग व्यक्तीची नोंद करण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्जुन भिमराव काकडे हे ७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास आसेगाव येथील घरातून कोणालाही काही न सांगता निघून गेले. त्यानंतर ते परत आले नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी नातेवाईक व परिसरात शोध घेतला. मात्र त्यांचा कुठेही ठावठिकाणा लागला नाही.याप्रकरणी अर्जुन काकडे यांचे नातेवाईक दिलीप अर्जुन काकडे (वय २५, रा. आसेगाव, ता. गंगापूर) यांनी दौलताबाद पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार मिसिंग क्रमांक १३/२०२६ दाखल करण्यात आला आहे.बेपत्ता अर्जुन काकडे यांची उंची सुमारे ५ फूट ५ इंच असून शरीरयष्टी मध्यम आहे. त्यांचे केस काळे असून ते घरातून निघताना गुलाबी रंगाचा शर्ट व पेन्सिल कलरची पँट परिधान केलेली होती. त्यांच्या हातावर मराठीत "अर्जुन काकडे" असे गोंदलेले ओळखचिन्ह आहे. त्यांची मातृभाषा मराठी आहे.अर्जुन काकडे यांच्याबाबत कोणाला काही माहिति मिळाल्यास त्यांनी तात्काळ दौलताबाद पोलीस ठाण्याशी किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## उमरगा जनता बँकेला नवीन ईमारत,२४२ कोटीच्या ठेवी,उत्कृष्ट ऑडीट वर्ग मिळवत प्रगतीचा चढता आलेख-चेअरमन शरण पाटील




**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** बँकेला नविन इमारत उभारणीस पूर्वपरवानगी मिळाली असुन पुढील वर्षीची सभा बँकेच्याच सभागृहात होईल. बँकेकडे २४२ कोटींच्या ठेवी असुन चालु वर्षात ४०० कोटी देवीचे उद्दिष्ट पूर्ण करु. सभासदांना १६१ कोटीचे कर्ज वाटप करुन बँकेकडे २७१ कोटी खेळते भांडवल आहे. संपलेल्या आर्थिक वर्षात ५ कोटी १४ लाखाचा नफा मिळाला आहे. बँकेच्या ठेवीमध्ये सातत्याने वाढ होत असून हे ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. सर्वसामान्यांचा विश्वास संपादन करुन बँकेने आरबीआयच्या सर्व निकषांचे पालन करून ऑडिट वर्ग मिळवल्याचे प्रतिपादन चेअरमन शरण पाटील यांनी केले.उमरगा जनता सहकारी बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि.२०) उमरगा येथे संपन्न झाली. यावेळी जिल्हा बँकेचे चेअरमन बापुराव पाटील, रामकृष्णपंत खरोसेकर, विठ्ठलराव बदोले, उपाध्यक्ष अॅड. विरसंगप्पा आळंगे, अॅड. प्रदिप पणुरे, विठ्ठलसाई कारखान्याचे कार्यकारी संचालक सुरेश गवसाने, बलभिम पाटील, केशव पवार, विजयकुमार सोनवणे, मल्लिनाथ दंडगे, संचालक डॉ. दिलीप गरुड, रफिक तांबोळी, अॅड. संजय बिराजदार, अॅड. प्रवीण पणुरे, भरत मारेकर, अण्णाराव कांबळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुराग लड्डा आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार बसवराज पाटील यांची विधानपरिषद निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मंजूर घेण्यात आला. पुढे बोलताना श्री पाटील म्हणाले की, बसवराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने अल्पावधीतच उत्तुंग भरारी घेतली आहे. बँकेने खातेदारांच्या सोईकरिता सोने तारण, सोलार, वाहन, गृह, व्यवसाय, सुवर्ण अलंकार व सौर गृह प्रकाश योजना, मराठा तरुणांना आण्णासाहेब पाटील महामंडळ अंतर्गत कर्ज वाटप सुरु आहे. बँकेच्या उमरगा, मुरुम, जेवळी, जळकोट, कासारशिरसी, सोलापूर व लातुर येथे शाखेतून क्यू आर. कोड, आय. एम. पी. एस., नेंच, एस एम एस, आरटीजीएस, एन ई एफ टी, कोअर बँकिंग सुविधा उपलब्ध असुन युपीआय, गुगलपे, फोनपे ची सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बँकेने आरबीआयच्या सर्व निकषांचे पालन करून अ ऑडिट वर्ग मिळवत विश्वास संपादन केला आहे. बँकेकडे २४२ कोटींच्या ठेवी असुन चालु वर्षात ४०० कोटी ठेवीसह बँकेला नविन इमारत उभारण्याची पूर्वपरवानगी मिळाली असुन पुढील वर्षीची सभा बँकेच्या सभागृहात होईल. सभासदांना १६१ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. खेळते भांडवल २७१ कोटी, गुंतवणूक १०८ कोटी असुन बँकेला चालू आर्थिक वर्षात ५ कोटी १४ लाख रुपये ढोबळ नफा झाला आहे. सभासदांच्या सहकार्याने बँकेचे नेट एन. पी. ए. केवळ १.६९ टक्के असुन झिरो टक्के एनपीएचे उद्दिष्ट ठेवल्याचे चेअरमन पाटील यांनी सांगितले. यावेळी सर्व संचालक, शाखाधिकारी, सभासद, ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्हा. चेअरमन अॅड. व्ही. एस. आळंगे यांनी प्रास्ताविक करुन अहवाल वाचन केले. अंबिका माळी यांनी श्रध्दांजलीचा ठराव मांडला. पुजा काळे यांनी सुत्रसंचलन केले तर संचालक भरत मारेकर यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६


# जे. ई. एस. महाविद्यालयात जागतिक विकास दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षी प्राणीशास्त्र विभाग जे. ई . एस. महाविद्यालय जालना यांच्या वतीने 20 ऑगस्ट रोजी जागतिक डास दिन साजरा केला जातो. या मध्ये विद्यार्थी, शिक्षक व इतर समाज घटक यांच्या मध्ये डास, त्याचे आजार आणि त्याचे व्यवस्थापन कसे करावे या विषयी जनजागृती करण्यात येते. या वर्षी पोलिस प्रशिक्षण केंद्र जालना येथील नवीन भरती झालेल्या जवानांसाठी खास सत्र घेण्यात आले. कारण ते दिवस रात्री कर्तव्य बजावत असताना त्यांना डासांपासून जास्त आजार होण्याचा धोका असतो. ते या माध्यमातून टाळू शकतील या साठी हे घेण्यात आले. जगभरात डासांमुळे 10 लाख लोक मरण पावतात व किमान 10 कोटी लोक त्या आजाराचे बळी पडतात. त्याच्या उपचारासाठी आरोबो रुपये खर्च होतात. हे सगळे टाळणे, त्यांची संख्या नियंत्रणात आणणे यासाठी प्राणीशास्त्र विभागात संशोधन चालत आहे. या विभागात 7 विद्यार्थी यावरवसंशोधन करत आहेत. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री व श्री. रुपणार RSI RPTS हे होते. प्रास्ताविक डॉ. गणेश फलके प्राणीशास्त्र विभाग यांनी केले, शुभेच्छा पर संदेश डॉ. उमेश मोगल उपप्राचार्य आणि अध्यक्षीय आरोप व शुभेच्छा प्राचार्यांनी दिल्या. जगभरात सगळ्यात जास्त लोक डासमुळे होणाऱ्या आजारामुळे मारतात. त्यामुळे याविषयी जागृती होणे गरजेचे आहेत. यासह त्यांनी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी व्याख्याते म्हणून डॉ. लक्ष्मीकांत शिंदे यांनी मार्गदर्शन केले. डासांचे प्रकार, आजार, कोणती काळजी घ्यावी, ते आजार होऊ नये म्हणून काय केले पाहिजे या विषयी सविस्तर माहिती दिली. या साठी महाविद्यालयातील विद्यार्थी , प्राध्यापक, व पोलिस प्रशासन केंद्र येथील 300 प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. आभार प्रदर्शन डॉ. तोटरे बाबुराव यांनी केले.

# कालिकादेवी विद्यालयात,स्व.राजीव गांधी यांची जयंती साजरी

**शिरूर :** प्रतिनिधीआदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि.बीड येथे,'विज्ञान विषयाचे श्री वसंत नारायण आहेर सर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.त्यानिमित्त विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी श्री वसंत आहेर सरांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा आयोजित केला होता.प्रारंभी लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.प्रमुख पाहुण्यांच्या सत्काराबरोबरच सत्कारमूर्ती श्री वसंत नारायण आहेर आणि त्यांच्या पत्नी सौ.जयश्री वसंत आहेर यांचा सपत्नीक कपड्यांचा आहेर, शाल, पुष्पहार,व श्रीफळ देऊन प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते सत्कार करून त्यांच्या एकूण ३२ वर्षे सेवेचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून श्री आहेर सरांच्या प्रदीर्घ सेवेचा सन्मान व गौरव करताना सांगितले की, सरांनी विज्ञान हा विषय सहज, सोप्या भाषेत शिकवून अनेक विद्यार्थी घडवले.शिक्षण बरोबरच विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्याची शिकवण दिली.आणि आपली सेवा यशस्वीपणे पूर्ण केली.यानंतर त्यांनी पुढील आयुष्याची वाटचाल योग्य दिशेने करावी.त्यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.तर श्री आहेर सरांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या सेवा काळातील विविध प्रकारचे अनुभव सांगितले.त्याचबरोबर स्व.काकूं-नाना,माननीय अण्णासाहेब व प्राचार्य केशव भांगे साहेब यांचे,तसेच विद्यालयातील सर्व सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानले.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर शिंदे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान प्रमुख,प्रा.संजय काकडे, परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे, प्रा.महादेव हांगे, प्रा.नारायण घोलप, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.दत्ता शिंदे, प्रा.रविंद्र संकपाळे, प्रा.अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.हनुमंत घायाळ प्रा.शशिकांत जावळे, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे, रविंद्र बडे, आप्पासाहेब कांबळे, विनायक सुरवसे, राजू बडे, रवी जोशी, नितीन बहिर,रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, नंदकुमार जाधव, विलास कांबळे, गौतम भोसले,यांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री जयेंद्र निकम यांनी केले.यावेळी कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# स्पर्धा परीक्षांच्या यशासाठी नियोजनबद्ध तयारी आवश्यक : बारवाले महाविद्यालयात चर्चासत्र संपन्न



**जालना :** विद्यार्थ्यांना शासकीय क्षेत्रातील रोजगाराच्या संधींची माहिती मिळावी आणि परीक्षांच्या तयारीसाठी योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कौशल्य विकास समिती आणि गणित विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्रासाठी श्री. उत्तम गोरे व श्री. सिद्धार्थ कोंघे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम आणि यशस्वी अभ्यासपद्धती यावर सविस्तर मार्गदर्शन केले.ते म्हणाले, नियोजनबद्ध तयारीची गरज: आजच्या तीव्र स्पर्धेच्या युगात केवळ पदवी शिक्षणावर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनापासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू करावी. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग , रेल्वे, बँकिंग, विमा क्षेत्र तसेच राज्य शासनाच्या सरळसेवा भरती प्रक्रियांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी त्यांनी सामान्य अध्ययन, चालू घडामोडी, गणित, बुद्धिमत्ता चाचणी, मराठी व इंग्रजी या विषयांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. अनेक परीक्षांच्या अभ्यासक्रमात साम्य असल्याने स्वतंत्र अभ्यासाऐवजी समान विषयांची एकत्रित व प्रभावी तयारी करण्याचा सल्ला देण्यात आला. * यशस्वी अभ्यासाची सूत्रे: वेळेचे अचूक व्यवस्थापन, मूलभूत संकल्पनांची स्पष्टता, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण, नियमित सराव, अचूकता आणि चालू घडामोडींचे सातत्यपूर्ण वाचन यावर विशेष भर देण्यात आला.या सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी पात्रता, वयोमर्यादा, टप्पे, संदर्भ साहित्य, ऑनलाइन साधने आणि मुलाखतीची तयारी याविषयी विचारलेल्या विविध शंकांचे मार्गदर्शकांनी समाधानकारक निरसन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य प्रो. डॉ. भूषण नाफडे यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास समितीचे प्रा. संदीप पाटील, डॉ. निलेश बर्डे, प्रा. रवींद्र शिंपी, डॉ. रामेश्वर मस्के, डॉ. रवींद्र भोरे तसेच गणित विभागाचे प्रा. अक्षय चेडे, श्री. सुंदर वायाळ, श्री. काशिनाथ खलसे व श्री. सुरेश खरात यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हे चर्चासत्र अत्यंत फलदायी ठरले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २० ऑगस्ट २०२६


## गोल गोल फिरते

पिठाची गिरणी,
गोल गोल फिरते.
चक्कीतले धान्य,
खूप बारीक करते. १

गोल फिरून धान्याचे,
बारीक करते पीठ.
पीठ मळताना आई,
पिठात टाकते मीठ. २

गोल फिरता चक्की
गिरणीत उडतो धूर,
पीठ जाऊन डोळ्यात,
येतोच अलगद पूर. ३

पिठाच्या गिरणीत,
धान्य येतात खूप.
गिरणीत आल्यावर,
बदलून जाते रूप. ४

गिरणीत थांबताच,
एक दोन तीन तास.
रंग बदलतो केसांचा ,
काळा पांढरा खास. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## सीता तुझ्या अंतर्मनाचे काय?

सीता , तुझ्या अंतर्मनाचे काय?
सगळ्यांनी तुझी परीक्षा घेतली,
पण तुझ्या मनाची परीक्षा
कधी कुणी घेतली काय?

अग्नीतून तू बाहेर आलीस,
पण आत किती जळलीस?
जगाने तुझ्या पावित्र्याचे पुरावे
मागितले,
तुझ्या अश्रूंचे पुरावे
कधी कुणी मागितले काय?

वनवास तुझ्या वाट्याला आला,
तू पतीच्या पावलांमागे चाललीस,
राजमहालापेक्षा काटेरी वाट
निवडलीस,
पण त्या वाटेवर
तुझ्या मनाला काय हवे होते—
कुणी विचारले काय?

रावणाने तुला पळवून नेले,
रामाने तुला परत आणले,
पण परत आल्यावरही
संशयाच्या सावल्या तुझ्याच मागे
राहिल्या...
सीता , सांग ना,
तुला माणूस म्हणून कुणी पाहिले
काय?

अग्निपरीक्षा दिलीस,
तरीही प्रश्न संपले नाहीत;
गर्भात दोन जीव घेऊन
पुन्हा वनवासाला निघालीस...
त्या क्षणी तुझ्या डोळ्यांतून
फक्त अश्रू आले होते का?
की आत कुठेतरी
एक स्त्री ओरडली होती—

"बस!
आता माझ्या अस्तित्वाची परीक्षा
घेऊ नका!"
तू लव-कुशांना जन्म दिलास,
आई म्हणून जगलीस,
पण सीता म्हणून
कधी जगलीस का?

तुझ्या त्यागाची पूजा झाली,
तुझ्या दु:खाची कथा झाली,
तुझ्या सहनशीलतेला आदर्श
म्हटले गेले;
पण तुझ्या मनात दडलेल्या
रागाला, प्रश्नांना, असहमतीला
कुणी आवाज दिला काय?
म्हणून आज विचारतो—
सीता , तुझ्या अंतर्मनाचे काय?

तू भूमीत सामावलीस,
पण प्रश्न अजून जिवंत आहेत;
तुझ्या मौनाच्या मातीखाली
अनेक स्त्रियांचे आवाज
आजही धगधगत आहेत.

आता तुझी कथा
फक्त त्यागाची राहू नये,
फक्त पावित्र्याची राहू नये;
ती प्रश्न विचारणाऱ्या स्त्रीची
असावी—
जी म्हणते,
"माझे आयुष्य माझे आहे,
माझ्या अस्तित्वाचा निर्णय
इतरांच्या संशयावर होणार नाही!"
सीता ,
तुझ्या अंतर्मनाला
आज पहिल्यांदा शब्द देतोय...
कारण इतिहासाने तुला देवी केले,
पण आम्हाला
तुझ्यातली माणूस असलेली स्त्री
शोधायची आहे.

**डॉ बाळासाहेब लिहिणार**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# डॉ. संतोष डाखरे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**भामरागड** - येथील राजे विश्वेश्वर राव कला वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संतोष डाखरे यांच्या विकास प्रशासन आणि पाश्च्यात्य राजकीय विचार या दोन पुस्तकांचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि चिंतामणी महाविद्यालय घुग्गुस यांच्या संयुक्त विद्यमाने घुग्गुस येथे पार पडलेल्या राज्यशास्त्र अभ्यासक्रम कार्यशाळेत गोंडवाना विद्यापीठाचे सिनेट तथा व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संजय गोरे, प्राचार्य डॉ. संजय आसुटकर, डॉ. नंदाजी सातपुते, डॉ. राजेंद्र झाडे, डॉ. राजेंद्र मुद्दमवार, डॉ. प्रमोद शंभरकर, डॉ. रवी धारपवार, डॉ. दिनकर चौधरी, डॉ. योगिराज उरकुडे, डॉ. विनोद चहारे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.डॉ. संतोष डाखरे हे राज्यशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य असून त्यांची सहा पुस्तके विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. यापूर्वी त्यांच्या राजकीय नेतृत्व या पुस्तकाचे विमोचन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याहस्ते झाले होते.

# फुले शाहू यांचा वारसा पुढे नेणारे भाऊसाहेब : प्रा. जगदीश गवळी




**उमरगा :** "महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा व कार्याचा वारसा पुढे नेणारे डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे खऱ्या अर्थाने शैक्षणिक व सामाजिक उन्नतीचे प्रेरणास्थान होते. त्यांचे कार्य एका प्रदेशापुरते मर्यादित न ठेवता त्याचा व्यापक विचार करण्याची गरज आहे," असे मत साई कॉलेजचे प्रा. जगदीश गवळी यांनी केले.श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर यांच्या वतीने आयोजित प्रबोधन व्याख्यानमालेचे चौथे पुष्प मंगळवारी (दि. १८) भारत शिक्षण संस्था, उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात पार पडले. संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.यावेळी प्रा. जगदीश गवळी यांनी 'भाऊसाहेब देशमुख : जीवन व कार्य'या विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या ओघवत्या शैलीत त्यांनी भाऊसाहेबांच्या जीवनकार्याचे विविध पैलू उलगडले. शिक्षण, सामाजिक परिवर्तन, शेतकरी आणि विद्यार्थी यांच्या हितासाठी भाऊसाहेबांनी केलेल्या कार्याचा त्यांनी आढावा घेतला."भाऊसाहेबांनी शाहू-फुले यांच्या विचारांचा वसा पुढे नेत शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनविले. त्यांच्या कार्यामागे समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची व्यापक भूमिका होती. त्यामुळे त्यांचे कार्य आजच्या पिढीसाठीही दिशादर्शक आहे," असे गवळी यांनी सांगितले.भाऊसाहेबांचे विचार देशपातळीवर पोहोचावेतकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर होते. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. राजेश बुरंगे, डॉ. अनिल सोमवंशी, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, उपप्राचार्य प्रा जी एस मोरे, पर्यवेक्षक प्रा एस ए महामुनी, प्रभारी प्राध्यापक डॉ एस पी इंगळे यांची उपस्थिती होती. त्यांनी भाऊसाहेबांचे विचार व कार्य अशा प्रबोधन व्याख्यानमालेच्या माध्यमातून देशपातळीवर पोहोचावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सामाजिक उन्नतीची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.डॉ. अतुल बोडखे यांनी प्रास्ताविकातून श्री शिवाजी शिक्षण संस्थेची प्रबोधन व्याख्यानमालेमागील भूमिका स्पष्ट केली. भाऊसाहेबांच्या विचारांचा व कार्याचा अधिकाधिक प्रसार होऊन त्यांची प्रेरणा सर्वव्यापी व्हावी, हा या व्याख्यानमालेचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या प्रारंभी भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवरांचा सत्कार भाऊसाहेबांची प्रतिमा व त्यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा ग्रंथ देऊन करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी. डी. बिराजदार यांनी केले, तर आभार डॉ. मिलिंद भिलपवार यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६

# जगात निशस्त्र एकच, सर्वव्यापी, बहुजनांचा आधार पंढरीचा पांडुरंग

मित्रांनो, आपण जरा वेगळा विषय घेऊन थोडसं चिंतन करणार आहोत. विठ्ठल महिमा, विठ्ठल भक्ती, संप्रदाय, संत संप्रदाय संत संप्रदायातील पुरोगामीत्व आणि संत सांप्रदायातला अधोगामित्व अशा दोन प्रवाहने हा संत संप्रदाय उभ्या जगावरती राज्य करतो आहे. भारतभूमी ही संतांची भूमी आहे. या भूमीवर तलवारीने साम्राज्ये उभी राहिली असतील पण प्रेमाने, समतेने आणि भक्तीने माणसांच्या हृदयावर राज्य करणारा एकच राजा आहे तो म्हणजे पंढरीचा पांडुरंग होय.जगात अनेक राजे आले, अनेक सम्राट झाले, अनेकांनी सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर आपली ओळख निर्माण केली. परंतु पंढरीच्या विठ्ठलाने ना सिंहासन मागितले, ना मुकुट मागितला, ना सोन्या-चांदीची संपत्ती मागितली. तो आजही 28 युगे विटेवर उभा आहे.हात कमरेवर ठेवून आपल्या बहुजन लेकरांची वाट पाहत!...म्हणूनच माझ्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा निशस्त्र जननायक कोण असेल, तर तो पंढरीचा पांडुरंग.त्याच्याकडे तलवार नाही, बंदूक नाही, सत्ता नाही, संपत्ती नाही; पण त्याच्याकडे आहे प्रेमाची ताकद, समतेचा विचार आणि भक्तीची ऊर्जा.पंढरपूरच्या वाळवंटात जेव्हा लाखो वारकरी एकत्र येतात, तेव्हा तिथे कोण मोठा आणि कोण लहान हा प्रश्न राहत नाही. कोणाची जात काय, कोणाचा धर्म काय, कोण श्रीमंत आणि कोण गरीब या सगळ्या भिंती जणू चंद्रभागेच्या पाण्यात विरघळून जातात.ज्ञानोबा-तुकोबांच्या गजरात, विठ्ठलनामाच्या जयघोषात आणि माऊलीच्या पालखीच्या सावलीत माणूस माणसाशी जोडला जातो.संत ज्ञानेश्वरांनी अध्यात्माला ज्ञानाची दिशा दिली. संत नामदेवांनी विठ्ठलाशी सख्यभाव निर्माण केला. संत एकनाथांनी मानवतेचा संदेश दिला. संत तुकारामांनी समाजातील दांभिकतेवर प्रहार करून सत्य, प्रेम आणि सदाचाराचा मार्ग दाखविला. संत चोखामेळा यांनी अस्पृश्यतेच्या वेदना सहन करत विठ्ठलाच्या चरणी आपले अस्तित्व अर्पण केले. संत जनाबाईंनी श्रमाला भक्तीचे रूप दिले. संत सावता यांनी शेतातील कष्टात विठ्ठल पाहिला. संत गोराबा काकांनी मातीच्या घड्यांमध्ये जीवनाचे तत्त्वज्ञान शोधले. संत सेना महाराज,संत नरहरी महाराज, संत कान्होपात्र या सर्व संतांनी एकच सांगितले की देव माणसापासून दूर नाही; तो माणसाच्या अंत:करणात आहे.हीच तर पंढरीची खरी शक्ती आहे!पांडुरंग हा केवळ मंदिरातील दगड नाही. तो शेतकऱ्याच्या घामात आहे, कष्टकऱ्याच्या श्रमात आहे, वारकऱ्याच्या पावलात आहे, आईच्या ममतेत आहे, उपाशी माणसाला दिलेल्या भाकरीत आहे आणि दु:खी माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसणाऱ्याच्या लाखो हातात आहे.म्हणूनच विठ्ठल काही मागत नाही.त्याला सोन्याचा मुकुट नको.त्याला राजेशाही वस्त्र नको.त्याला महाल नको.त्याला मोठमोठे नैवेद्य नको.त्याला हवी आहे फक्त निर्मळ भक्ती आणि माणुसकी."देवाला काय द्यावे?" या प्रश्नाचे उत्तर संत तुकाराम महाराजांनी आपल्या जीवनातून दिले. देवाला वस्तू नको; मन द्या. भक्ती द्या. सत्य द्या. परोपकार द्या.पंढरीचा विठ्ठल म्हणजे बहुजनांचा आधार आहे. ज्याच्याकडे कोणी नाही, त्याच्यासाठी विठ्ठल आहे. ज्याच्या हातात काही नाही, त्याच्यासाठी विठ्ठल आहे. ज्याच्या डोळ्यांत अश्रू आहेत, त्याच्यासाठी विठ्ठल आहे.म्हणूनच वारकरी म्हणतो"माझा विठ्ठल माझा आधार,माझा जीवनाचा तोच श्वास."वारी ही केवळ धार्मिक यात्रा नाही. ती लोकशाहीची, समतेची आणि सामाजिक एकात्मतेची चालती-बोलती विद्यापीठे आहेत. हजारो लोक एकत्र चालतात. एकमेकांना मदत करतात. तहानलेल्या वारकऱ्याला पाणी देतात. आजारी पडलेल्या व्यक्तीची सेवा करतात. अनोळखी माणसाला आपले मानतात.हीच खरी भक्ती!आज समाजात जात, धर्म, भाषा, प्रदेश, श्रीमंती-गरीबी यांच्या नावाने माणसामाणसांत अंतर निर्माण होत असताना पंढरीचा पांडुरंग आपल्याला पुन्हा एकदा सांगतोमाणूस आधी, बाकी सर्व नंतर.संत परंपरेने महाराष्ट्राला हीच शिकवण दिली. संतांनी देवाला मंदिराच्या चार भिंतींत बंद केले नाही. त्यांनी देवाला रस्त्यावर आणले, शेतात आणले, घराघरात आणले आणि माणसाच्या हृदयात बसवले.आज आपण विज्ञानाच्या युगात जगत आहोत. विज्ञानाने जग जवळ आणले; पण माणसामाणसांतील अंतर कमी करण्याचे काम अजून बाकी आहे. तिथे संतविचारांची आणि विठ्ठलभक्तीची गरज आहे.आपल्या भक्तीला विवेकाची जोड हवी. श्रद्धेला विज्ञानाची जोड हवी. मंदिराबरोबर समाजाचीही सेवा झाली पाहिजे. विठ्ठलाच्या चरणी डोके टेकवताना एखाद्या गरजू माणसाला हात देण्याची तयारी झाली पाहिजे.विठ्ठलाच्या दर्शनापेक्षा विठ्ठलाच्या विचारांचे आचरण मोठे आहे.एखाद्या मुलाला शिक्षण देणे, एखाद्या शेतकऱ्याला मदत करणे, एखाद्या विधवा महिलेच्या जीवनाला आधार देणे, एखाद्या गरीब रुग्णाला उपचार मिळवून देणे, पाण्यासाठी झाडे लावणे, नदी-नाले स्वच्छ ठेवणे, समाजातील अंधश्रद्धा आणि व्यसनांविरुद्ध जनजागृती करणे—हीच आजच्या काळातील विठ्ठलभक्ती आहे.कारण "जिथे सेवा, तिथे विठ्ठल; जिथे समता, तिथे विठ्ठल; जिथे माणुसकी, तिथे पांडुरंग!"पंढरीचा पांडुरंग हा एका जातीचा नाही, एका धर्माचा नाही, एका प्रदेशाचा नाही. तो बहुजनांचा आहे, कष्टकऱ्यांचा आहे, शेतकऱ्यांचा आहे, वारकऱ्यांचा आहे आणि माणुसकीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचा आहे.चंद्रभागेच्या तीरावर उभा असलेला हा विठ्ठल जणू संपूर्ण मानवजातीला आवाहन करतो.हीच संतांची शिकवण.हीच वारकरी संप्रदायाची वाट.हीच पंढरीची ओळख.आणि हीच पांडुरंगाची खरी भक्ती!आजच्या तरुणांनी विठ्ठलाच्या विटेकडे केवळ देव म्हणून पाहू नये; त्या विटेकडे स्थैर्य, संयम आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक म्हणून पाहावे.संत ज्ञानेश्वरांचे ज्ञान, संत नामदेवांची भक्ती, संत एकनाथांची मानवता, संत तुकारामांचा निर्भीड सत्यविचार, संत चोखामेळ्यांची समतेची आर्त हाक, संत जनाबाईंची श्रमभक्ती, संत सावता माळींची कष्टनिष्ठा आणि संत गोरा कुंभारांचा साधेपणा—या सर्व संतविचारांचा केंद्रबिंदू म्हणजे पंढरीचा पांडुरंग.म्हणूनच माझ्या मनात एकच भावना उमटते—जगात निशस्त्र एकच,सर्वव्यापी एकच,बहुजनांचा आधार एकच,समतेचा जननायक एकच—तो म्हणजे पंढरीचा पांडुरंग!तो काही मागत नाही.तो कोणावर रागावत नाही.तो कोणाला दूर लोटत नाही.तो फक्त हात कमरेवर ठेवून उभा आहे.आपल्या माणसाची वाट पाहत!चला, या आषाढी-कार्तिकीच्या वारीत केवळ पंढरपूरकडे चालू नका; माणुसकीकडे चला.विठ्ठलाच्या दर्शनासाठी डोळे मिटण्यापूर्वी एखाद्या दु:खी माणसाच्या डोळ्यातील अश्रू पाहा.विठ्ठलाला नमस्कार करण्यापूर्वी श्रम करणाऱ्या हातांना नमस्कार करा.आणि विठ्ठलाच्या चरणी माथा टेकवताना मनाशी एक संकल्प करा."मी जात-धर्माच्या भिंती तोडीन,समतेचा विचार रुजवीन,निसर्गाचे रक्षण करीन,ज्ञानाची मशाल पेटवीन,आणि माणसामाणसांत प्रेम निर्माण करीन."कारण शेवटी पांडुरंगाला आपण काय अर्पण करतो, यापेक्षा पांडुरंगाच्या विचारांनी आपण काय बदलतो, हेच महत्त्वाचे आहे.

**भूमिपुत्र वाघ**
**मो. 91729 72482**

## स्वातंत्र्य दिनानिमित्त वृक्षारोपण



**कन्नड :** संत तुकाराम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयातील परिसरात वड, पिंपळ, कडुनिंब, उंबर इत्यादी झाडांचे रोपे मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली. विनायकराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा आमदार किशोर पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रत्येक विद्यार्थीना एक एका झाडांची जबाबदारी देण्यात आली. यावेळी संचालक विश्वासबापू मोतिंगे प्राचार्य डॉ शरद गावंडे, उपप्राचार्य संतोष मतसागर यांच्या सह मोठ्या संख्येने प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## अंजनेश्वर महादेव मंदिरात त्रिदिनात्मक रुद्रयाग व प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न





**दौलताबाद (जावेद अहमद) :** आसेगाव-तळेसमान येथील अंजनेश्वर महादेव मंदिरात १८ ते २० ऑगस्टदरम्यान त्रिदिनात्मक अचल प्राणप्रतिष्ठा व रुद्रयाग सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. तीन दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्यात विविध धार्मिक विधी, रुद्रयाग, प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.मंदिरात काळ्या पाषाणातील महादेवाची पिंड, नर्मदानदीतील शालिग्राम शिवलिंग आणि काळ्या पाषाणातील नंदी यांची विधिवत पूजा-अर्चा करूनउदय मुळे, अतुल जोशी, कृष्णा जोशी, संतोष जोशी आणि वरद मुळे आणि लांबेश्वर संस्थान लामणगाव महंत नारायणगिरी महाराज व आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते व ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात अंजनेश्वर महादेव मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळा 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. अंजना प्रतिष्ठान चे शंकर पल्हाळ, स्मिता पल्हाळ, स्वर्णजित पल्हाळ,मोनिका पल्हाळ, बीएमसी मुंबई चे मुख्य अभियंता अनिलकुमार जांभोरे, नायर हॉस्पिटलच्या असिस्टंट डीन डॉ. सारिका जांभोरे यांच्या हस्ते पूर्णाहुती पार पडली. यावेळी माजी आमदार भामरे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, भाजपा अल्पसंख्य महामंत्री शेख बने, अशोक आम्ले, प्रभु बागुल, कडू कीर्तीकर ,प्रेरणा गुप्ता, ऋतुजा बारामती कर, स्नेहा पवार, देव साठे,यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन. डॉ.शिवाजी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २० ऑगस्ट २०२६




# "जगावेगळा बाप" पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन; राजू शेट्टींच्या हस्ते सोहळा संपन्न



**कन्नड :** शेतकरी बापाविषयीची कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या डॉ. शिवाजी हुसे लिखित "जगावेगळा बाप" या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच पुणे येथे चाकण परिसरात थाटात पार पडले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व शेतकरी नेते मा. खा. राजू शेट्टी साहेब यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.या प्रसंगी बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, डॉ. शिवाजी हुसे यांनी प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करून शिक्षण घेतले. ते प्राध्यापक असून साहित्यिक आहेत. शेतकरी चळवळीसह विविध साहित्यिक व सामाजिक चळवळींमध्येही ते सक्रियपणे कार्यरत आहेत. "शेतकऱ्याच्या मुलाने स्वतःची ओळख निर्माण करून समाजाला मोठे योगदान दिले आहे. 'जगावेगळा बाप' या पुस्तकातून त्यांनी एका शेतकरी बापाचा त्याग, संघर्ष, परिश्रम आणि मुलांना दिलेले शिक्षण व संस्कार यांचे अतिशय प्रभावी चित्रण केले आहे. प्रत्येक शेतकरी मुलाने आणि प्रत्येक शेतकरी बापाने आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.शेतकरी जीवनातील वास्तव, बापाचे कष्ट आणि मुलांवरील निस्सीम प्रेम या भावना या पुस्तकातून मांडण्यात आल्या आहेत. त्यामुळे हे पुस्तक केवळ साहित्य म्हणूनच नव्हे तर शेतकरी कुटुंबांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी डॉ. प्रकाश पोफळे, राज्य सदस्य भाऊसाहेब थोरात, माजी प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप, कृष्णा साबळे, दिनकर पवार, सचिन गायके, राजू बोंगाणे, प्रकाश बोरसे, यादव कांबळे, मेने अप्पा यांची उपस्थिती होती.

# अनेक शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न शिक्षक दरबारात निकाली!



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रमम काळे यांच्या अध्यक्षतेखाली व छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी अश्विनीताई लाठकर , प्राथमिक शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे ,शिक्षण अधिकारी योजना राकेश साळुंके, प्राचार्य राजेंद्र कांबळे व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकारी यांच्या उपस्थितीत बुधवार दिनांक 19 ऑगस्ट रोजी प्रादेशिक विद्या प्राधिकरण, जुने शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिक्षक बंधू भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक संघटनाचे पदाधिकारी, संस्थाचालक आदींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती या दरबारात होती. अनेक शिक्षकांची प्रलंबित प्रश्न शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी या दरबारात संबंधित अधिकारी यांच्यासोबत चर्चा करून निकाली काढले. शिक्षक आमदार व संबंधित सर्व अधिकारी यांच्यासमोरच प्रलंबित प्रश्न मांडण्याची संधी उपस्थितांना मिळाली. उपस्थित शिक्षक व इतर सर्व कर्मचाऱ्यांचे अनेक प्रकरणे निकाली निघाल्यामुळे शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.आश्वासित प्रगती योजना दहा वीस तीस, अंशतः अनुदानित टप्पा वाढ, शिक्षकांना कॅशलेस वैद्यकीय सेवा, जुनी पेन्शन योजना, सेवा संरक्षण व इतर शिक्षक बंधू भगिनी यांचे राज्यस्तरावरील प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न चालू असून लवकरच राज्यस्तरीय प्रश्न निकाली निघेल असे आश्वासन शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी दिले.याप्रसंगी राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप विखे, राष्ट्रवादी शिक्षक संघ प्राथमिकचे जिल्हाध्यक्ष मनोज खुटे, राष्ट्रवादी शिक्षक संघ महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा आशा डांगे, रमाकांत छडीदार, वाहेद शेख,विलास उमाप आरेफ शेख, अकिल पठाण, योगेश गायकवाड, रमेश ठाकूर ,अविनाश काळे, प्रशांत मरकड ,किरण निकम, गजानन मोघे,प्रा. हरिदास सोमवंशी, प्रा. नितीन कवडे, प्रल्हाद जाधव, प्रा प्रशांत दंदे,प्रा.शेख मन्सूर, दिलीप ढाकणे व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६


# ज्येष्ठ नागरिकांचे हक्क : सन्मानाची खरी कसोटी

२१ ऑगस्ट रोजी 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन' साजरा केला जातो. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील प्रश्न, त्यांच्या गरजा, समाजातील त्यांचे स्थान आणि त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने या दिवसाला विशेष महत्त्व आहे. हा दिवस केवळ ज्येष्ठांचा गौरव करण्याचा किंवा त्यांना शुभेच्छा देण्याचा दिवस नसून, वृद्धत्वाकडे समाज कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो, ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचा प्रत्यक्ष लाभ मिळतो का आणि त्यांना सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्यासाठी आवश्यक सामाजिक वातावरण उपलब्ध आहे का, याचा विचार करण्याची संधी आहे. आयुष्यभर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या उभारणीत योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना वृद्धावस्थेत सुरक्षितता, आरोग्य, आर्थिक आधार, कौटुंबिक आपुलकी आणि सामाजिक सन्मान मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ज्येष्ठ नागरिक हे समाजावरील ओझे नसून अनुभव, ज्ञान, संस्कार आणि सामाजिक स्मृतीची अमूल्य संपत्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे दयेच्या नव्हे, तर मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि नागरिकांच्या प्रतिष्ठेच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.वृद्धत्व हा मानवी जीवनाचा स्वाभाविक टप्पा आहे. बालपण, तारुण्य, प्रौढत्व आणि वृद्धत्व या जीवनप्रवासातील नैसर्गिक अवस्था आहेत. वय वाढले म्हणून व्यक्तीची मानवी प्रतिष्ठा, नागरिकत्व किंवा मूलभूत अधिकार कमी होत नाहीत. शरीराची कार्यक्षमता काही प्रमाणात कमी होऊ शकते; परंतु जीवनानुभव, ज्ञान, कौशल्य, विवेक आणि सामाजिक भान यांचे मूल्य कमी होत नाही. उलट अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे अनेक दशकांचा अनुभव असतो. कुटुंब, शेती, शिक्षण, उद्योग, प्रशासन, साहित्य, कला, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवन अशा विविध क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान समाजाच्या जडणघडणीचा महत्त्वाचा भाग आहे. म्हणून वृद्धत्वाला दुर्बलतेचे प्रतीक मानण्याऐवजी अनुभव आणि ज्ञानाच्या समृद्धीचा टप्पा म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे.भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठ व्यक्तींना आदर देण्याची दीर्घ परंपरा आहे. संयुक्त कुटुंबव्यवस्थेत आजी-आजोबा आणि कुटुंबातील इतर ज्येष्ठ व्यक्ती हे घरातील अनुभवाचे आणि संस्कारांचे केंद्र असत. मुलांच्या संगोपनात त्यांचा सहभाग असे. लोककथा, इतिहास, परंपरा, संस्कृती, जीवनमूल्ये, स्थानिक ज्ञान आणि कुटुंबाचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम ज्येष्ठ करत असत. मात्र बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे संयुक्त कुटुंबव्यवस्था कमी झाली. रोजगार आणि शिक्षणासाठी तरुणांचे स्थलांतर वाढले. शहरीकरण आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैलीमुळे कुटुंबातील परस्पर संवादाचे स्वरूप बदलले. परिणामी अनेक ज्येष्ठ नागरिक एकटे राहतात, तर काही जण कुटुंबासोबत असूनही भावनिक एकाकीपणाचा अनुभव घेतात. या बदलत्या परिस्थितीत ज्येष्ठांच्या हक्कांचे संरक्षण अधिक महत्त्वाचे ठरते.ज्येष्ठ नागरिकांचा सर्वांत मूलभूत अधिकार म्हणजे सन्मानाने जगण्याचा अधिकार होय. वय वाढले म्हणून एखाद्या व्यक्तीचे मत, अनुभव किंवा निर्णयक्षमता संपत नाही. घरातील निर्णयांमध्ये ज्येष्ठांचा सहभाग असणे, त्यांच्या मतांचा आदर करणे आणि त्यांच्या भावना समजून घेणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या कुटुंबावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ व्यक्तीलाही स्वतःचा स्वाभिमान असतो. तिच्या प्रत्येक गरजेकडे उपकार म्हणून पाहणे चुकीचे आहे. 'आता तुमचे वय झाले आहे', 'तुम्हाला काही समजत नाही' किंवा 'तुम्ही आमच्यावर अवलंबून आहात' अशा मानसिकतेतून ज्येष्ठांना कमी लेखणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आघात करणारे आहे. ज्येष्ठांची सेवा ही उपकाराची नव्हे, तर कृतज्ञतेची आणि सामाजिक जबाबदारीची भावना असली पाहिजे.ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांमध्ये सुरक्षिततेचा अधिकार अत्यंत महत्त्वाचा आहे. वृद्ध व्यक्तींना शारीरिक हिंसा, मानसिक छळ, दुर्लक्ष, आर्थिक शोषण, फसवणूक आणि मालमत्तेवर बेकायदेशीर दबाव यांपासून संरक्षण मिळाले पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचार अनेकदा घराच्या चार भिंतींच्या आत घडतात. कौटुंबिक प्रतिष्ठा, नातेसंबंध आणि समाजाच्या प्रतिक्रियेच्या भीतीमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक तक्रार करण्यास टाळाटाळ करतात. काही वेळा अत्याचार करणारी व्यक्तीच त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणारी असल्यामुळे ज्येष्ठांना विरोध करणे कठीण जाते. त्यामुळे त्यांना विश्वासार्ह तक्रार निवारण व्यवस्था, कायदेशीर मार्गदर्शन आणि सामाजिक आधार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांनी अन्याय सहन करणे ही संस्कृती बदलली पाहिजे.भारतामध्ये पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या देखभालीसाठी कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे भरणपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा या संदर्भातील महत्त्वाचा कायदा आहे. ज्येष्ठ नागरिकांना भरणपोषण आणि आवश्यक आधार मिळावा, त्यांची उपेक्षा होऊ नये आणि त्यांच्या कल्याणासाठी संस्थात्मक व्यवस्था उपलब्ध व्हावी, हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. मात्र कायदा असणे आणि तो गरजू नागरिकांपर्यंत पोहोचणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ग्रामीण भागातील, अशिक्षित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती अनेकदा नसते. त्यामुळे कायदेशीर साक्षरता वाढविणे आणि तक्रार निवारणाची प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे. हक्कांची माहिती असणे हीच हक्कांच्या संरक्षणाची पहिली पायरी आहे.आर्थिक सुरक्षितता हा ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचा महत्त्वाचा आधार आहे. संघटित क्षेत्रातील काही व्यक्तींना निवृत्तीनंतर निवृत्तीवेतन किंवा इतर आर्थिक साधनांचा आधार मिळतो; परंतु असंघटित क्षेत्रातील अनेक कामगार वृद्धावस्थेत नियमित उत्पन्नाविना राहतात. शेतमजूर, लघु शेतकरी, घरगुती कामगार, कारागीर, छोटे व्यावसायिक आणि इतर असंघटित कामगारांनी आयुष्यभर कष्ट केलेले असतात; परंतु वृद्धापकाळासाठी पुरेशी आर्थिक तरतूद झालेली असेलच असे नाही. महागाई, औषधोपचाराचा खर्च आणि दैनंदिन गरजा यामुळे त्यांची आर्थिक असुरक्षितता वाढते. म्हणून वृद्धापकाळातील सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन, आरोग्यसुरक्षा आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचणे आवश्यक आहे.आरोग्याचा अधिकार हा ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनमानाशी थेट जोडलेला आहे. वाढत्या वयाबरोबर नियमित आरोग्य तपासणी, औषधोपचार, तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, आपत्कालीन उपचार आणि पुनर्वसनाच्या सुविधांची आवश्यकता वाढते. ग्रामीण भागातील ज्येष्ठांना आरोग्यसेवा मिळविण्यासाठी लांब अंतर पार करावे लागणे, वाहतुकीचा अभाव किंवा उपचाराचा खर्च परवडत नसणे अशा अडचणी येऊ शकतात. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हास्तरीय आरोग्यसेवा यंत्रणेत ज्येष्ठ नागरिकांच्या गरजांचा विशेष विचार केला पाहिजे. आरोग्यसेवा ही दया नसून सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत गरज आहे. ज्येष्ठ नागरिकांना उपचार घेताना सन्मानजनक वर्तन आणि योग्य माहिती मिळणेही तितकेच आवश्यक आहे.शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्यालाही समान महत्त्व दिले पाहिजे. निवृत्तीनंतर दैनंदिन जीवनातील भूमिका बदलतात. मुलांचे स्थलांतर, जोडीदाराचे निधन, मित्रपरिवार कमी होणे, सामाजिक सहभाग घटणे आणि एकाकीपणा यामुळे मानसिक ताण वाढू शकतो. काही ज्येष्ठ नागरिकांना आपले जीवन निरर्थक झाल्याची भावना निर्माण होऊ शकते. अशा वेळी कुटुंबीयांनी त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या भावना ऐकून घेणे, त्यांना घरातील निर्णयांमध्ये सहभागी करणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याचा अधिकार म्हणजे उपचार मिळण्यापुरता मर्यादित नसून प्रेम, आपलेपणा, भावनिक आधार आणि सन्मानाचे वातावरण मिळण्याचा अधिकारही आहे.मालमत्ता आणि संपत्तीशी संबंधित हक्क हा ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील अत्यंत संवेदनशील विषय आहे. आयुष्यभराच्या कष्टातून मिळविलेले घर, जमीन, बचत किंवा इतर संपत्ती ही वृद्धावस्थेतील सुरक्षिततेचा आधार असते. काही वेळा भावनिक दबाव, फसवणूक किंवा चुकीची माहिती देऊन ज्येष्ठांकडून मालमत्ता हस्तांतरित करून घेतली जाते. त्यानंतर त्यांची उपेक्षा किंवा छळ केला जातो. त्यामुळे मालमत्तेशी संबंधित निर्णय घेताना ज्येष्ठांना स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी आणि आवश्यक कायदेशीर माहिती मिळणे गरजेचे आहे. ज्येष्ठांच्या मालमत्तेवर हक्क मिळविण्यापेक्षा त्यांच्या सन्मानाचा आणि सुरक्षिततेचा विचार महत्त्वाचा आहे. मालमत्तेच्या प्रश्नावरून ज्येष्ठ व्यक्तीला घरातच असुरक्षित वाटू लागणे ही अत्यंत गंभीर सामाजिक विसंगती आहे.ज्येष्ठ महिलांच्या हक्कांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. आयुष्यभर घर आणि कुटुंबाची जबाबदारी पार पाडलेल्या अनेक महिलांकडे स्वतःच्या नावावर पुरेशी आर्थिक साधने नसतात. पतीच्या निधनानंतर त्यांची आर्थिक आणि सामाजिक असुरक्षितता वाढू शकते. ग्रामीण भागातील वृद्ध महिलांना आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा, निवास, आर्थिक सहाय्य आणि कायदेशीर माहिती मिळविताना अधिक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे ज्येष्ठ महिलांना त्यांच्या मालमत्ता हक्कांची, आर्थिक योजनांची, आरोग्यविषयक सुविधांची आणि कायदेशीर संरक्षणाची माहिती देणे आवश्यक आहे. वृद्ध महिला ही केवळ कुटुंबाची सेवा करणारी व्यक्ती नसून स्वतंत्र अधिकार असलेली नागरिक आहे, ही जाणीव समाजात दृढ झाली पाहिजे.आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात डिजिटल समावेश हाही ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचा महत्त्वाचा भाग बनला आहे. बँकिंग, आरोग्यसेवा, तिकीट आरक्षण, शासकीय सेवा आणि विविध आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर डिजिटल झाले आहेत. डिजिटल साधनांचा वापर न समजल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना इतरांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे त्यांना भ्रमणध्वनी, डिजिटल बँकिंग आणि शासकीय संकेतस्थळांचा सुरक्षित वापर शिकविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सायबर फसवणूक, बनावट दूरध्वनी, खोटे संदेश, फसवे गुंतवणूक प्रस्ताव आणि आर्थिक गैरव्यवहार यांपासून सावध राहण्याचे प्रशिक्षण देणेही गरजेचे आहे. डिजिटल साक्षरता ही ज्येष्ठांच्या स्वावलंबनाची नवी गुरुकिल्ली ठरू शकते.ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक सहभागाचा अधिकार मिळणेही आवश्यक आहे. वृद्धत्व म्हणजे समाजातून निवृत्ती नव्हे. अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे समाजासाठी देण्यासारखे ज्ञान, कौशल्य आणि अनुभव असतो. निवृत्त शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतात. अनुभवी शेतकरी पारंपरिक कृषिज्ञान पुढील पिढीला देऊ शकतात. कारागीर कौशल्याचे प्रशिक्षण देऊ शकतात. विविध क्षेत्रांत काम केलेले ज्येष्ठ तरुणांना व्यावसायिक आणि जीवनविषयक मार्गदर्शन देऊ शकतात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी ज्येष्ठांच्या अनुभवाचा समाजहितासाठी उपयोग करून घेण्यासाठी संधी निर्माण केल्या पाहिजेत. ज्येष्ठांचा अनुभव आणि तरुणांची ऊर्जा यांचा संगम सामाजिक विकासासाठी अत्यंत परिणामकारक ठरू शकतो.ज्येष्ठ नागरिकांना सार्वजनिक जीवनातही सुलभ आणि सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक आहे. सार्वजनिक वाहतूक, शासकीय कार्यालये, बँका, रुग्णालये आणि इतर सार्वजनिक ठिकाणी बसण्याची सुविधा, सुलभ प्रवेश, आवश्यक मार्गदर्शन आणि सुरक्षित हालचालीची व्यवस्था असावी. उद्याने, वाचनालये, विरंगुळा केंद्रे आणि सामाजिक संवादासाठी सार्वजनिक जागा उपलब्ध असणे त्यांच्या मानसिक आणि सामाजिक आरोग्यासाठी उपयुक्त आहे. गावांच्या आणि शहरांच्या विकासाचे नियोजन करताना ज्येष्ठ नागरिकांच्या गरजांचा विचार करणे म्हणजे सर्वसमावेशक समाजाच्या निर्मितीकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल होय.ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी केवळ शासनाची नाही. कुटुंब, समाज, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना, माध्यमे आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांची भूमिका महत्त्वाची आहे. कुटुंबाने प्रेम, आपुलकी आणि सुरक्षितता द्यावी. समाजाने ज्येष्ठांना सक्रिय सहभागाच्या संधी द्याव्यात. शासनाने कायदे आणि कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवाव्यात. स्वयंसेवी संस्थांनी हक्कांविषयी कायदेशीर आणि सामाजिक जनजागृती करावी. माध्यमांनी ज्येष्ठांच्या समस्यांकडे केवळ भावनिक दृष्टिकोनातून न पाहता अधिकार आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहावे. ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांवर सार्वजनिक चर्चा वाढली तर त्यांच्या समस्यांकडे धोरणात्मक पातळीवर अधिक गांभीर्याने पाहिले जाईल.ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचा प्रश्न हा केवळ आजच्या वृद्ध पिढीचा प्रश्न नाही. आजचे तरुण उद्याचे ज्येष्ठ नागरिक आहेत. आपण आज ज्येष्ठांशी ज्या पद्धतीने वागतो, त्याच समाजात उद्या आपल्यालाही वृद्धत्वाचा अनुभव घ्यावा लागणार आहे. त्यामुळे ज्येष्ठांच्या हक्कांचे संरक्षण करणे म्हणजे आपल्या भविष्यातील समाजाचे संरक्षण करणे होय. वृद्धत्वाला दुर्बलता, एकाकीपणा आणि परावलंबित्वाशी जोडण्याऐवजी अनुभव, ज्ञान, सन्मान आणि सामाजिक योगदानाशी जोडले पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांना समाजाच्या काठावर ठेवण्याऐवजी विकासाच्या मुख्य प्रवाहात स्थान देणे ही लोकशाही आणि समताधिष्ठित समाजाची गरज आहे.२१ ऑगस्टचा जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन हा केवळ ज्येष्ठांना शुभेच्छा देण्याचा किंवा त्यांचा सत्कार करण्याचा दिवस न राहता त्यांच्या हक्कांविषयी आत्मपरीक्षण करण्याचा दिवस ठरला पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने जगण्याचा, सुरक्षित राहण्याचा, आरोग्यसेवा मिळविण्याचा, आर्थिक आधाराचा, मालमत्तेचे संरक्षण करण्याचा, सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा, निर्णयप्रक्रियेत आपले मत मांडण्याचा आणि प्रेम व आपुलकी मिळविण्याचा अधिकार आहे. त्यांना दयेची नव्हे, तर सन्मानाची गरज आहे; उपकारांची नव्हे, तर अधिकारांच्या हमीची गरज आहे. त्यांच्या हक्कांचे संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि लोकशाही मूल्यांची खरी कसोटी आहे. ज्येष्ठांच्या अनुभवाला योग्य स्थान, त्यांच्या जीवनाला सुरक्षितता आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला स्वाभिमान मिळाला, तरच समाज खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुसंस्कृत म्हणता येईल. म्हणूनच 'ज्येष्ठ नागरिकांचे हक्क' हा एका दिवसापुरता विषय न राहता प्रत्येक कुटुंबाच्या संस्कारांचा, प्रत्येक संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा आणि प्रत्येक नागरिकाच्या मानवी कर्तव्याचा अविभाज्य भाग झाला पाहिजे.




**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल — bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २० ऑगस्ट २०२६


# मैलाच्या दगडाचा लिलाव:-धारदार निर्धाराची कविता

शेषराव पिराजी धांडे हे आंबेडकरी विचारांचे धारदार निर्धारक कवी आहेत.त्यांची कविता परिवर्तनाचा अस्सल प्रज्ञाप्रेरक ध्यास घेऊन निघालेली एक सृजनशील ध्येय पथिकाची पाथेय कविता.परिवर्तनाचे अक्षर वाटसरू म्हणून विद्रोही मनोभूमिकेतून ते आजच्या वर्तमानाची अस्वस्थ बेइमानीची एक सल उजागर करणारी ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल ठणक व्यक्त करते.म्हणजे हा मैलाचा दगडचं लिलावात निघाला आहे.आपल्या अंतरंगी मनाचा आरसा क्षणोक्षणी पहा तेव्हा कळेल की ही प्रजासत्ताक संविधानाचे पाने इथल्या व्यवस्थेने कशी आपल्या सोयीनुसार वापरली आहे.फायद्यासाठी कायद्याचा वापर करून स्वार्थ साधणारी इथली बांडगूळ कवीने शोधली आहेत.हातावर घडी तोंडावर बोट करायला निघालेली व्यवस्था.मैलाचा दगड.मोठा पराक्रम. पण हा आधुनिक युगात लिलावात काढल्या जातो आहे.'आरसा तेवढा बघत जा अधुनमधून'"एवढं मात्र खरं/वर्तमानाशी संघर्ष करताना/कुणालाही आपली करंगळी धरू दिली तरी चालेल/पण,मनगट मात्र धरू देऊ नये.(पृ.१५)ही धम्म चळवळ तथागतांनी आपल्या शांती सुख समृद्धीसाठी केली आहे.पण आज अशांत अस्थिर राजकीय सामाजिक आर्थिक दिसते आहे.मनगट हातात गेले की,जो संविधानीक हिंसाआहे तो गेलाच म्हणून समजा.आज सर्वहारा जाती पाती पंथ यांच्या लवकंडी लावताना दिसतो आहे.'लढाई', ढासळत चाललेली गढी, आरशाला आलो ओलांडून, आजच्या वर्तमानाची अस्वस्थ वेदना तर आहेच पुन्हा, व्यवस्थेच्या विरूद्ध, गुलामीकडे वाटचाल सूरू झाली.ही सखेद वेदनेची तीव्रता ही कविता देऊन जाते.'आदमखोर'ही एक तीव्र स्वरूपाची कविता.तुझ्यासाठी मी थोडा उजेड काढून ठेवला,आदमखोरांनी उजेडाला गहाण ठेवलं,सूर्याची गाणी उजेडाच्या गोष्टी सांगून ही काहीच उजेड पडत नाही.कवी म्हणतो मी कशासाठीआंधाळ्याच्या वस्तीत आरसे विकू..सनसनीत झापड ही कविता देऊन जाते.'कंदिल' या कवितेचा मर्मग्राही आस्वाद असा "उमटत चालली माझ्या डोळ्यांत/तुला पालनकर्ता तरी कसं म्हणू?/जळत्या वातीला तेल तरी कसं टाकू?/भूतकाळाला जरा आठवत बसावे/वर्तमानाचा आरसा उजळून बघावे."(पृ.२१) तथागत गौतम बुद्धांच्या त्रिशरण पंचशीलांच्या मध्यम सम्यक संबुध्दांच्या विचारांची बांधिलकी घेऊन आलेली ही कविता.शेषवंत आहे.या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे आजच्या समकालीन वास्तवाचे सम्यक भान जागृत केले आहे.कविता ही चिंतनाची डूब घेऊन वास्तवाची प्रखर उब देते.या कवितेने समकालीन राजकीय सामाजिक व विकासाची विषमता अधोरेखित केली आहे.'विश्वासघातकी' आयुष्याची भाकरी देते उदासीनतेच्या कळा'अशी प्रखर वास्तववादी जाणीव ही कविता देते.असा ही देश होता, तथाकथित बांधत होते प्रार्थनास्थळे ही भाकड भाकीत आजही चालूच आहे.'बोन्साय करायला निघालेत ते' हे भ्रम आहेत कोणत्या सिद्धांताच्या कसोट्या घासून पाहणारे आहेत.विवेकाचा फुसका बाजार,'कशी हिंमत ठेवून बघावा आरसा'ही वास्तवाची प्रखर जाणीव करून देत ही कविता म्हणते "खाटकाने संभ्रम निर्माण करावा/बोकडाच्या मनात/हिरव्या पाल्याचे द्यावे अभिवचन/तसाच वाटत सुटला तो/अच्छे दिनाची आश्वासनं/कशी हिंमत ठेवून बघावा आरसा."(पृ.२६)या समकालीन सामाजिक राजकीय व्यवस्थेचा आरसा दाखवणारी ही कविता आहे.'जगण्याची नोंदी बिनदिक्कत होताना 'भ्रमात मारला जात आहे माणूस 'यातील प्रखर जाणीवेच्या प्रतिमा अशा आहेत 'लोकशाही हत्येची सुपारी, सृजनात्मक फुलांना मारल्या जाते कळीतच, सम्यक विचारक्रांतीच्या गतीला आणली जाते आडकाठी,ही भ्रमाची सुपारी देऊन माणसं मारली जात आहेत.कवी समग्र आंबेडकरी विचारांची बांधिलकी घेऊन आलेले आहेत 'आजून माझी चाल बाकी आहे, आभाळवृत्ती,निघालेत डोळे आरसा तडकविण्यास,'चाल'किती बदलून घ्याव स्वतःला,म्हणून आरशाकडे बघून माणूस जगत नसतो,तर जगता जगता माणूस सहज आरशात बघत असतो' ही मनोनिग्रहाची भूमिका अत्यंत ठळकपणे ही कविता देऊन जाते.हे वास्तव आहे जे नाकराता येतं नाही.'स्थिती,सत्तेसाठी असावीच लागते प्रजा,मुळ मालक, डिजिटल इंडिया,चतूर झाला अंधार इथला,आम्ही मुळनिवाशी आहोत.इथलं काळकिभिन्न अंधार जाळं संविधान प्रकाशाने उजळून निघालं आहे.आमची एक वैश्विक विचारांची बांधिलकी आहे अशी ही कविता संयत मनोभूमिकेतून आलेली आहे.झाडांच्या मुळ्याचं तोडणारी इथली बांडगूळी व्यवस्था आहे म्हणून 'पालवीच वर्तमान दिसत नाही सुखदायक',/आरसा करीत नाही भेदाभेद/तुझ्यात आणि माझ्यात" (पृ.४३)ही सविनय चिंतन आशय देऊन जाणारी कविता आहे.तरी द्वेष,सूर्यपाखरू झाले पाहिजे,'वर्तमानात स्वप्नांचा केला खून'धोक्याचा सायरन,अस्वस्थ काळाची गोष्ट, शब्दांची श्रीमंती, सुगंध कारूण्याचा,मी मिसळवत नाही सुरात सूर,'मी शहर आणि अस्वस्थता' इथल्या जातीअंताचा छुपा द्वेष आहे, स्वप्नांचा खून होतो आहे,ही कविता जणू धोक्याचेच सायरन देते आहे.या भंयकराच्या दारात उभे राहून आम्ही 'तरीही महासत्तेचे स्वप्न पाहतो आम्ही,ही चतूर निती फितूर होते मग दंगल घडते हा साक्षेपी अनुभव ही कविता देऊन जाते.आजच्या काश्मीरची सखेद वेदनेची खंतही आहेच.सत्ता नेहमीचं जातीचा पत्ता टाकून राजकीय खेळी खेळते.मग आणखी एक एन्काऊंटर असं सारं या गाभडं व्यवस्थेची वाभाडे काढत ही कविता संयत विद्रोही भूमिकेशी ठाम आहे.कारण 'हातवर घडी तोंडावर बोट' यातील जीवघेण्या प्रतिमा अशा 'समतेला केलं कुपोषित,हे गुलामीचं स्वातंत्र्य,बंधुत्वाचा खून,न्याय पोत्यात बांधून,असे हेआजूबाजूला उगवत असतात कर्मठ चेहरे, दिसत नसतं तसं, आरसा अजून उतरून ठेवला नाही, आभाळाशी हात पुरवू कशाला?ही समकालीन समस्या जळत राहते तेच आजचे वास्तव म्हणजे हे उपवर्गीकरण.माणुसकीच्या माणसात जातीच्या आधारावर आरक्षण वर्गीकरण.रक्तात धर्मची खूण दिसत नाही.असा मनोज्ञ प्रश्न ही कविता करते.या कवितेने समकालीन वास्तवाचे सम्यक भान देणारे प्रश्न विचारले आहेत 'या सम्यक कुळाचा सम्राट,एक लुगड्यानं कुणी म्हणालं होतं नाही,"'अच्छे दिनांची' घोषणा केली म्हणून बदल नसते परिस्थिती/आता आपण आपलाच सम्राट शोधला पाहिजे/आकाशाची वाटणी समांतर झाली पाहिजे"(पृ.७१)ही धारदार निर्धाराची भाषा व ध्येयासक्ती देऊन जाणारी कविता आहे 'अनेक हिशोब चुकते करायचे आहेत बाकी'ही प्रखर वास्तववादी जाणीवेची कविता आहे.ही सत्ता जर अनाथ असेल तर अनाथांच्या नाथातुज तुज कसे नमो! कारण कावळे डोमकावळे, इथल्या व्यवस्थेच्या डिशॲन्टिन्यावर तर बसले आहेच पण भामटे बगळे व्यवस्थेच्या पाण्यात समाधिस्थ आहेत.हे प्रखर वास्तव ही कविता सांगते.उल्कापात मध्ये ओठांवर सूर्यगाणी, जिभेवर सूर्यकिरणे, सूर्याला पंख, हे सारे असतांनाही काळ सोकावतो ही सखेद वेदनेची तीव्रता ही खरी अस्सल सल उजागर करणारी ही कविता आहे.यावर'काळ कुणालाच माफ करत नसतो,या वाटा म्हणजे "बुध्दाच्या रस्त्यावर उमटत चाललेत पाय/जातक कथेतील सूचक आता उमजायला लागले"(पृ.७५) तथागत भगवान बुद्धांच्या प्रकाश वाटेने मातीशी प्रमाणिक ही कविता एक नितळ श्रेध्दय निर्लेप निस्पृह आरसा दाखविणारी ही कविता संयत मनोभूमिकेतून मर्मग्राही अनुबंध देऊन जाते.आज 'मूल्यं हरवलेली माणसं'त्याचा स्वत्वाचा उडालेला पारा,मग नातं मनाचं गोतं निखळून पडतं.तरीही अंतरीचे धावे, मनाचा 'जागल्या' होऊन कवी लिहितो "भूलथापेच्या आहारी गेले/अंधभक्त होऊन गेले/आरसा तेवढा दाखवतो आहे/तुम्ही, आम्ही जळतो आहे"(पृ.८०)ही प्रज्ञेच्या उजेडाच्या दिशेने जाणारी कविता आहे.तथागत बुध्दांच्या विचारांकडे घेऊन जातो उजेड हीउजेडाची गीतं होऊन नवं चैतन्य पेरत ही कविता आली आहे.नाहीतर आपल्या "मी आलो बुध्दाच्या भूमीतून,/ अंगीकारतो बगळ्याचं रूप/, दरबारी आरसा ठेवत चला "(पृ.८५)या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे ही संयत मनोभूमिकेतून आंदोलन करणारी कविता आहेच.म्हणून 'पेटू शकतो रान, कारण आता 'आरक्षण' भीक नको हक्क हवे,द्या नको आम्हाला बाबांचे आभाळ हवे'ही कविता जणू 'पहाटेचा सूर्य होतो आहे तेजोमय'ही भूमिका घेऊन आलेली आहे जसे आम्ही कुठल्याही आभाशी शक्तीला कशासाठी घाबरायचं, आम्ही आमच्या प्रतिभेच्या जोरावर आजचं खरं वैभवीचित्र बघणारं अहोत.आम्ही कुणाच्या हाताचं खेळणं होणारं नाही.आम्ही दिनवाने दिवसही मोजत बसणार नाही अशी समकालीन वास्तव्याची ठिणगी ही कविता पेटवून देते.ही कविता एका निस्सीम अध्ययन अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची कविता आहे.जेव्हा चिमुकले बालकं प्रश्न विचारतात "सर, अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे काय?/मी देऊच शकत नाही त्याचं उत्तर/असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत/जनहिताच्या मालिकेतील/कुणाकुणाला दाखवीत फिरू मी दुनियेचा आरसा."(पृ.९३)हा सारंग सूर म्हणजे ही एक सृजनशील चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक धार निर्धार व्यक्त करणारी कविता आहे.ख्यातनाम अभ्यासक डॉ शैलेंद्र धर्मदास लेंढे याची पाठराखण अशी"शेषराव पिराजी धांडे सरळमार्गी कार्यकर्त्याची व संवेदनशील व्यक्तीची कविता आहे.या कवितेमध्ये समकालीन प्रश्नोपप्रश्नांच्या संबंधात व समाजातील घडामोडींच्या संबंधात अंतर्मुख करणारे आकलन प्रकट होत जाते.कवीचा स्वतःचा असा वैशिष्ट्यपूर्ण आहे.हा आरसा सामाजिक स्थिती -गतीला समजून घेण्यासाठी व तेथील समाजव्यवस्थेचे आकलन करण्यासाठी कवीने दिशादर्शक मानले आहे.या आरशामध्ये ते समकालीन वास्तवाचे बिंब-प्रतिबिंब न्याहाळत जातात आणि त्या आधारे समकालीन वास्तवाचे टिचणारे - जुळणारे,भंगणारे-दूभंणारे संदर्भ स्पष्ट करत जातात.या कवितासंग्रहातून प्रगट होणारे हे विभिन्न प्रकारचे संदर्भ जीवनसमृद्धी व अनुभवसमृध्दीदेणारे आहेत"(ब्लर्ब)ही चिंतन चिकित्सक अभ्यासक पाठराखण मनस्वी आहे.प्रदिप खेतमर यांचे मुखपृष्ठ आशय संपन्न आहे.



**पुस्तक:-मैलाचा दगड (कवितासंग्रह)कवी:-शेषराव पिराजी धांडे प्रकाशक:-विष्णू जोशी,काव्याग्रह प्रकाशन वासिम मुखपृष्ठ:-प्रदिप खेतमर,पुणे प्रथमावृती:-१जानेवारी २०२४किंमत:-१२०/रुपयेपुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना संवाद:-९९७५१३७३३७**